शासन वि. डिमाजी.

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन</u>**

**<u>भाषा मराठीत पुरावा</u>**

**<u>अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२ ची शपथेवर साक्ष</u>**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः अनंता चंदर वाघमारे ,

वयः ३३ वर्षे, व्यवसायः मोलमजुरी,

राहणारः पालेखुर्द, ता. रोहा, जि. रायगड.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए.एल. पवार यांच्यामार्फत :</u>**

०१. दि.१२.०३.२०२३ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. सदर दिवशीचे पंचनाम्यावर माझी सही आहे. परंतू त्यातील मजकूर मला माहिती नाही.

**<u>साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>**

०२. हे म्हणणे खरे आहे की, दि.१२.०३.२०२३ रोजी पोलीसांनी मला मौजे चिंचवली तर्फे दिवाळी खोंडा आदिवासीवाडी येथे बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझेसोबत दुसरा पंच राम अनंत जाधव याला देखील तेथे पोलीसांनी बोलाविले होते, सदर गावातील आरोपीचे घराचे मागे त्याचे ताब्यात प्लॅस्टीक कॅनमध्ये पोलीसांना ०५ लिटर गावठी हातभट्टीची दारू मिळाली होती, सदर मुद्देमालापैकी १८० मि.लि.दारू सी.ए.परिक्षणाकरीता वेगळी सिलबंद करण्यता आली, त्याचा पोलीसांनी माझेसमक्ष पंचनामा तयार केला, त्यावर मी

शासन वि. डिमाजी.

वाचून सही केली.

०३. मी इयत्ता दहावी पर्यत शिक्षण घेतले आहे. मला लिहीता वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखतो, त्यामुळे मी त्याला वाचविण्याकरीता आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. सागर भगत यांनी नाकारला.**

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.03.11 15:01:10 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)

दि.११.०३.२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.